MHCH040005962025

<u>सत्र खटला क्र. ४७/२०२५</u>
<u>मधील अर्ज</u>
<u>आदेश नि. क्र.१७ वर</u>
<u>पृथ्वीराज सुरेश पवार</u> .... <u>अर्जदार</u>
<u>मार्फत, मुखत्यार</u>
<u>सागर अशोक परदेशी</u>
<u>वि.</u>
<u>महाराष्ट्र सरकार मार्फत</u>
<u>पो. स्टे. वरोरा</u>

**( दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी पारित )**

०१. अर्जदार याने वरोरा पोलीस स्टेशन येथील अपराध क्र.४८०/२०२५ मध्ये महिंद्रा बोलेरो पीकअप कंपनीचे चारचाकी वाहन नोंदणी क्र.एम.एच.-२७ एक्स-८२१० ही जप्त केलेली असुन ती सुप्रतनाम्यावर मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. सदरचे वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे आहे. तिचा इंजिन क्र.GHG1C22989 व चेसीस क्र. MA1ZN2GHKG1C33025 आहेत. त्याकरीता त्याने निशाणी ४३ च्या यादीप्रमाणे मुखत्यारनामा, स्वतःचे आधार कार्ड आणि सदर वाहनाचे आर.सी. ची प्रत दाखल केलेले आहेत.

०२. सदर प्रकरणात सरकारी अभियोक्ता यांचा अभिप्राय मागविण्यात आला. त्यानुसार त्यांनी निशाणी २० वर त्यांचा अभिप्राय दाखल केला. त्यांचा आक्षेप आहे की,सदरचे वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास तो त्याच्यात बदल करेल किंवा ति-हाईत इसमास विकून टाकेल. त्यामुळे सदरचे वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्यात येवू नये.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तपासादरम्यान जप्त केलेली मालमत्ता ही अर्जदाराच्या दैनंदिन वापराची आहे. त्यामुळे त्याला अडचण निर्माण झालेली आहे. ती परत मिळण्याकरीता त्याने सदरचा अर्ज केलेला आहे.

०४. दोन्ही पक्षकारांच्या विदवान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आपआपल्या कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

०५. अर्जदारास त्याच्या दैनंदिन वापराकरीता सदर वाहनाची त्यास आवश्यकता आहे. सदर वाहन त्याच्या मालकीचे आहे. त्याकरीता त्याने आवश्यक ते कागदपत्र दाखल केले आहेत. अर्जदाराने न्यायालयातर्फे अर्ज मंजुर करतांना लावण्यात येणा-या अटी व शर्तींचे पालन करण्यास त्याने तयारी दर्शविली आहे. त्यामुळे, अर्जदार हा स्वतः जप्त वाहनाचा मालक असल्याचे अभिलेखावर दिसुन येते. जप्त मालमत्ता पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास तिचे तांत्रीक नुकसान होवु शकते. अर्जदार हा या प्रकरणात आरोपी नाही. परंतू अर्जदाराने ज्या व्यक्तीला मुखत्यारपत्र दिलेले आहे तो हया खटल्यात आरोपी आहे. तरीदेखील सदरचे वाहन पो.स्टे. ला ठेवून काही उपयोग होणार नाही व अटी व शर्तीवर सदरचे वाहन सुप्रतनाम्यावर देण्यास काहीएक हरकत नाही. करीता मी खालीलप्रमाणे अंतीम आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अपराध क्र.४८०/२०२५ मध्ये महिंद्रा बोलेरो पीकअप कंपनीचे चारचाकी वाहन नोंदणी क्र.एम.एच.-२७ एक्स-८२१० , **अर्जदारातर्फे मुखत्यार सागर अशोक परदेशी** राह. वाडे, तह. भाडेगाव, जि. धुळे यास रु.२,००,०००/- अक्षरी रु. दोन लाख रुपयाचे नुकसान भरपाईचे पत्र (Indemnity Bond) आधारे परत देण्यात यावी.

३. पोलीस स्टेशन अधिका-याने सदर मुददेमालाचे अर्जदाराच्या खर्चाने चार छायाचित्र काढून घ्यावेत व त्याबाबतचा पंचनामा तयार करण्यात यावा व तो पंचनामा व छायाचित्र दोषारोपपत्रासोबत जोडावेत.

४. अर्जदारास असे निर्देशीत करण्यात येते की, सदरच्या मालमत्तेच्या स्वरुपात बदल करु नये अथवा विक्री अथवा कोणासही हस्तांतरीत करु नये. तसेच तपासणी अधिकारी अथवा न्यायालय आदेश करतील तेव्हा ती मालमत्ता हजर करावी.

५. अर्जदाराने वाहन ताब्यात मिळाल्यानंतर कुठल्याही गुन्ह्यात त्याचा वापर करू नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAVIN PANDURANG ABHANG
Date: 2026.04.01 13:30:08 +0530

दिनांकः ३१/०३/२०२६

**( प्र. पां. अभंग )**
अति.सत्र न्यायाधिश, वरोरा.